
Dr. Nisha Bhandare
(पृष्ठ क्र. २२)

Sanshodhan Vishwa
ISSN 2456-2548

# संशोधनविश्व

**A Research Annual of Post-Graduate Research Centre, Department of Marathi**

Vol. I (Issue 1) December 2017



*Progressive Education Society's*

**MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE**

Shivajinagar, Pune - 411005.

Website: www.moderncollegepune.edu.in

# संशोधनविश्व

## मराठी पदव्युत्तर संशोधन केंद्र

A Research Annual of Post-Graduate Research Center,

Department of Marathi (मराठी विभाग)

Vol. I (Issue 1) December – 2017

ISSN: 2456-2548

*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce**

Shivajingar, Pune 411005

**प्रमुख पुरस्कर्ते**

प्रा.डॉ.गजानन एकबोटे

**पुरस्कर्ते**

प्रा.पद्माकर चिरपुटकर
प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे
डॉ.अ. के.पांडे

**मुख्य संपादकीय सल्लागार**

डॉ.स.य.परांजपे

**संपादकीय सल्लागार**

डॉ.राजेंद्र झुंजारराव
डॉ.अमृता ओक
प्रा.अ.गो.गोसावी
प्रा. श्यामकांत देशमुख

**संपादक**

डॉ.निशा भंडारे

**संपादकीय मंडळ**

डॉ.वैजयंती जाधव
डॉ. गजानन अपिने
डॉ. मधुरा कोरान्ने
डॉ. वैशाली आहेर
प्रा. अशोक बोबडे
प्रा. वसंत कुलकर्णी

**प्रकाशक**

पदव्युत्तर संशोधन केंद्र, मराठी विभाग,मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य
महाविद्यालय,शिवाजीनगर,पुणे, ५

© प्रकाशक,पदव्युत्तर संशोधन केंद्र, मराठी विभाग, मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य
महाविद्यालय,शिवाजीनगर,पुणे, ५

**सजावट आणि मुद्रण**

चिंतन प्रकाशन, पुणे

ई-मेल: chinttanpublications@gmail.com, संपर्क : ८८८८१०१०५५, ९२२६२६

**महत्त्वाची सूचना**

अंकातील मजकुराविषयीचे सर्व अधिकार प्रकाशकाकडे सुरक्षित असून पुनर्मुद्रणासाठी प्रकाशकाची पूर्वपरवानगी
आहे. लेख व त्यातील विचार हे पूर्णपणे त्या त्या लेखकाचे/लेखिकेचे असून त्यांच्याशी प्रकाशक सहमत असेलच
लेखाच्या मुद्रणविषयक अचूकतेची शक्य तेवढी खबरदारी प्रकाशकाने घेतली असून मुद्रित लेखाची जबाबदारी
हे लेख मूलतः अभ्यासविषयक असून, वाचक त्यातील विधाने आणि आशयाशी सहमत असतीलच असे नाही.
यदाकदाचित काही अपूर्णता, आक्षेप किंवा नुकसान होणार असेल तर त्याची जबाबदारी प्रकाशकाची

# रा. ना. चव्हाण यांची पुरोगामी वैचारिक जडणघडण

**डॉ.निशा भंडारे ***

**मराठी विभाग प्रमुख, मॉडर्न महाविद्यालय, पुणे- ५.**

रा. ना. चव्हाण म्हणजे पहिले दलितमित्र पुरस्कार विजेते. २०१३ हे रा. ना. चव्हाण यांचे जन्म शताब्दी वर्ष, त्यानिमित्ताने आजच्या पिढीपर्यंत त्यांच्या पुरोगामी लेखनातील विचार पोहोचणे क्रमप्राप्त ठरते. आजच्या तांत्रिक आधुनिक काळात तरुण पिढीला जागृत करणे आपले कर्तव्यच ठरते. त्या वेळचे विचार काळाच्या कसोटीवर घासून पाहता ते योग्य होते. ते आजच्या समाजासमोर आणण्याचे कार्य आपण केले पाहिजे. कारण त्या वेळी चव्हाण यांनी एकच ध्यास घेतला होता – वाचन, मनन, चिंतन व लेखन. एक दोन नाही तर सतराशे ते अठराशे वैचारिक लेख विविध वृत्तपत्र, नियतकालिकांमधून प्रसिद्धीस येत होते. उदाहरणार्थ – दै.पुढारी, राष्ट्रवीर, दै. दीनबंधू, नवभारत, शिवनेरी, इत्यादी. त्यांनी बहुजन समाजाचा जागरच लेखांद्वारे मांडला होता. रा. ना. चव्हाणांचा परिचय या लेखनातून देण्याचा स्तुत्य प्रयत्न.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील बहुजन समाजातून जी अनेक विचारवंत मंडळी पुढे आली त्यात रा. ना. चव्हाण यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. बहुजन समाजात परिवर्तन होण्यासाठी रा. ना. चव्हाण यांनी सातत्याने १९५० ते १९९० या काळात आपली लेखणी झिजवली. समाजाची सर्वांगीण प्रगती हे त्यांच्या विचारांचे प्रमुख सूत्र होते. महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सामाजिक सुधारणांच्या आधुनिक इतिहासात प्रार्थना समाज व सत्यशोधक समाज, ब्राह्मणेतर चळवळ यातील आंदोलनांमधून अज्ञेयवादी आणि बुद्धीप्रामाण्यवादी सुधारकांच्या चळवळीचा प्रवाह एकत्र आलेला होता. या चळवळींची १९२५ नंतर झालेली उत्कृष्ट परिणती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेली 'दलित चळवळ'. रा. ना. नी महाराष्ट्राच्या या आंदोलन युगालाच आपल्या लेखांचे विषय बनवले आहे. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील सुमारे दीडशे वर्षाच्या कालखंडाचा परामर्श त्यांनी आपल्या लेखांमधून घेतलेला दिसतो. ग्रामीण साहित्य व दलित साहित्याला बळ देण्याचे काम जसे अनेक समाजसुधारक-विचारवंतांनी केले तसेच रा. ना. चव्हाण यांनीही केले आहे. पण मराठी वैचारिक समीक्षेकडून ते नेहमीच दुर्लक्षित राहिलेले दिसतात.

रामचंद्र चव्हाण यांचे वडील नारायणराव शाहू महाराजांच्या नेतृत्त्वाखाली कोल्हापूर येथे समाजजागृतीसाठी कार्यरत असलेल्या 'सत्यशोधक चळवळीत' सहभागी झाले. वडिलांच्या नीतीसंपन्न संस्कारातूनच त्यांची जडणघडण झाली.

रा. ना. चव्हाणांचे प्राथमिक शिक्षण वाईमध्ये व महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात झाले. त्यांनी घरची आर्थिक परिस्थिती डबघाईला आल्याने शिक्षण सोडून प्राथमिक शाळेत नोकरी केली.

* संपर्कासाठी: Email:< nishabhandare@gmail.com>

त्यावेळी त्यांच्या मनावर सामाजिक, राजकीय जागृतीचा मोठा परिणाम झाला. याच काळात त्यांचा परिचय महर्षी शिंदे यांच्याशी झाला. ते सामाजिक, शैक्षणिक व राजकीय पुरोगामी विचारांकडे आकर्षित झाले.

१९३७ साली चिपळूण येथील माधवराव बळवंत डांगे यांची कन्या इंदिरा हिच्याशी नारायण यांचा ब्राह्मो समाजात विवाह झाला. या विवाहात बहुजन समाजातील स्पृश्य-अस्पृश्य असे अनेक लोक आले होते. विवाह पारंपरिक पद्धतीने झाला नाही. पुढे नोकरीत स्थिरता नसल्याने शंभर टक्के संसाराची धुरा इंदिराबाईंनीच सांभाळली. रा. ना. चव्हाणांवर बालपणापासूनच वाचनाचे संस्कार, सत्यशोधकी जलसे, ब्राह्मणेतर परिषदा, मान्यवरांची भाषणे यांचा सकारात्मक परिणाम जाणवतो. १९४५-४६ या काळात ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या सान्निध्यात आले. 'राष्ट्रवीर', 'मराठा जागृती', इत्यादी वृत्तपत्रांमधून त्यांचा लेखनप्रपंच सुरू झाला. पन्नास वर्षांत त्यांनी अनेक वृत्तपत्रांमधून, नियतकालिकांमधून लेखन केलेले दिसते.

रा. ना. चव्हाण यांनी तुलनात्मक वैचारिक लेखांमधून प्रांजळपणे, निःपक्षपाती तुलना केलेली दिसते. यातून त्यांच्या समतोल परिपक्व, संशोधनवृत्तीचा प्रत्यय येतो. त्यांनी प्राचीन युगापासून ते एकविसाव्या शतकापर्यंतच्या विचारवंत, समाजसुधारक, तत्वज्ञांच्या विचारांची तुलना केलेली आहे. उदाहरण संत तुकाराम महाराज व छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रात एकाच समयी दिसतात. या दोघांच्या कृती-विचारांमधील साम्य-भेद दाखवणारे प्रदीर्घ लेख त्यांनी लिहिले आहेत. मराठी साहित्यविषयीची बदलती स्थित्यंतरे मांडण्याचा प्रयत्नही त्यांनी केला आहे. रा. नां. ना मराठी साहित्य वादप्रिय व वितंडवाद घालणारे वाटते. साहित्यातून समतोल साधला जावा असे त्यांना वाटते. "लेखकाची मानसिकता ब्राह्मणी होण्याचे कारण येथील सार्वजनिक शिक्षण पद्धतीत आहे," असेही ते नमूद करतात.

व्यक्तीकार्यवर्णनपर स्वरूपाचे अनेक लेख त्यांनी लिहिले आहेत. यात महात्मा फुले यांच्या विषयीचे पंचेचाळीस, राजर्षी शाहू महाराज यांच्या विषयी तीस लेख, महर्षी वि. रा. शिंदे यांच्या विषयी तीस लेख, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विषयी चाळीस लेख आहेत, कर्मवीर भाऊराव पाटील व बापूजी साळुंखे यांच्या कार्याविषयी प्रत्येकी पाच लेख आहेत. या सगळयांमधून रा. ना. चव्हाण यांच्यावरील ह्या व्यक्तिमत्त्वांचा प्रभाव दिसतो.

रा. ना. चव्हाणांनी स्वतःची अशी सत्यशोधक चळवळीविषयी भूमिका मांडली आहे. या विषयी त्यांचे तीसेक लेख प्रसिद्ध झालेले दिसतात. ते 'सत्यशोधक' चा व्यापक अर्थ सांगण्याचा प्रयत्न करतात. "ज्यांनी, ज्यांनी स्वार्थ बाजूला सारत जनसामान्यांची बाजू घेतली व लोकांना प्रामाणिक आचारधर्म सांगितला अशा सर्वांनाच ते सत्यशोधक समजतात." सत्यशोधक समाजाचे भवितव्य तीन कालखंडात विशद करतात. (१) महात्मा फुले, (२) राजर्षी शाहू महाराज, (३) महात्मा गांधी हत्येपर्यंतचा काळ. तसेच, सत्यशोधक समाजाची विधायक व विध्वंसक अशी दोन अंगे ते निर्देशित करतात. समाजजागृती व शिक्षणप्रसार हे विधायक अंग तर भिक्षुकशाहीचे उच्चाटन हे विध्वंसक अंग.

सत्यशोधक समाजाने सामाजिक जातीय व्यवस्थेवरील गुलामगिरीचे उद्घाटन केल्याचे दिसते. यासाठी बहुजन समाजाची मनोभूमिका तयार करण्याचे कार्य या चळवळीने केलेले दिसते. या कार्यासाठी कार्यकर्त्यांनी काही हेतू, ध्येय, उद्दिष्टे, तत्त्वेही ठरवलेली होती. त्याविषयीचे विचारही त्यांच्या लेखांमधून मांडलेले दिसतात. ते म्हणतात, "शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाचे पुनरूज्जीवन कोल्हापूर येथे केले. यामागे बहुजन हिताची भूमिका होती. सत्यशोधक विचारांच्या प्रसार-प्रचारांसाठी माध्यम म्हणून वृत्तपत्रे, जलसे, अधिवेशने, परिषदा, साहित्य, इत्यादींची निर्मिती केली. यातून बहुजन समाजाला व शूद्रातिशूद्रांना जागृत करणे हेच उद्दिष्ट दिसते." तसेच, महात्मा फुले यांच्या क्रांतिकारक विचारांच्या प्रभावाने प्रेरित होऊन मुस्लिम समाजाने ही 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' स्थापन केले. यात हमीद दलवाई यांनी पुढाकार घेतलेला दिसतो. या संघटनेचे कार्य महाराष्ट्राबाहेर मध्यप्रदेश, गुजरात, ओरिसा, कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश पर्यंत पोहचले होते.

रा. ना. 'ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादाचे स्वरूप' व 'बहुजनवाद' या संकल्पना दहाएक लेखांमधून मांडतात. महात्मा फुल्यांच्या समानतेच्या विचारांच्या आधारे पुढे शाहू महाराजांनी बहुजन समाजासाठी केलेल्या कार्याचा उल्लेखही करतात. १९३४ नंतर ब्राह्मणेतर पक्षाने नवे वळण घेतलेले दिसते. केशव जेध्यांच्या नेतृत्वाखाली मोठा वर्ग कॉंग्रेसमध्ये विलीन झाला. परंतु डॉ. आंबेडकर व त्यांचे अनुयायी यांनी मात्र गांधीजी व कॉंग्रेसला प्रखर विरोध करण्याचा शाहू महाराजांचा वारसा पुढे चालवल्याचे चित्र दिसते. या संदर्भातील रा. ना. चव्हाणांचे विचार महत्त्वाचे आहेत. "मराठा तत्सम ब्राह्मणेतर चळवळींच्या कार्यकर्त्यांकडून पूर्वास्पृश्यांची सुधारणा व स्वोन्नती होणार नाही. असे अनुभवाअंती बाबासाहेबांचे मत झाले व त्यांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' काढून स्वतंत्रपणे राजकारणात भाग घेतला. ही ब्राम्हणेत्तर चळवळ कालौघात बदलण्याची 'वैयक्तिक दोष व हितसंबंध' आणि 'अंतर्गत जातीभेद' अशी दोन कारणे सांगितली आहेत."

रा. ना. चव्हाण यांची वैचारिक मांडणी बहुजन वादाविषयी आहे ती अशी 'पिढ्यान् पिढ्या सत्ता संपत्तीपासून, शिक्षणापासून, ज्ञानापासून दूर राहिलेला बहुजन समाज आता लोकशाहीमध्ये तरी सामाजिक, राजकीय, आर्थिकदृष्ट्या परिपक्व व्हावा. यासाठी या समाजाने आपापसातले भेद मिटवत, वृथा अहंकार सोडत ज्ञान-विज्ञानाची कास धरावी, अंधश्रद्धा, रूढी, प्रथा, परंपरा, जातीयवाद, कर्मकांडे यांचा त्याग करत स्वोन्नती साधावी अशी भूमिका एकंदर लेखनातून दिसते. तिलाच 'बहुजनवाद' असे म्हणतात.

रा. ना. चव्हाणांच्या लेखनाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये एकूणच त्यांच्या वैचारिक लेखनाची समीक्षा करताना त्यांच्या लेखनाची वाङ्मयीन शैली वैशिष्ट्ये नमूद केली आहेत. त्यांच्या लेखनातील बलस्थानांचा मागोवा घेतला. तेव्हा रा. ना. चव्हाणांच्या लेखनातील वैविध्यता, आशयसौंदर्य, शैलीवैशिष्ट्ये एक अभ्यासक, विचारवंत म्हणून वाखाणण्याजोगे आहेत. त्यांच्या लेखांमधून नेमस्त पद्धती, समतोलपणा, तर्कशुद्धता आणि तटस्थता ही बलस्थाने दिसतात. भाषेच्या लालित्यापेक्षा विचारांच्या संघर्षाकडे त्यांचे अधिक लक्ष होते. 'उपरोध' हा विशेष गुण त्यांच्या लेखनात आढळतो. वैचारिक संघर्षातूनच नवीन

विचारांचे नवनीत निघते. हे त्यांनी स्वानुभवाने ओळखले होते. त्यांच्या लेखाची भाषा मांडणी भारदस्त व प्रौढ आहे. त्यामध्ये सहजता आणि सोपेपणा आहे. उच्च दर्जाची वैचारिकता त्यातून प्रगत होते.

रा. ना. चव्हाणांची लेखनशैली नेमस्तवादी व समन्वयवादी आहे. विरोध विकसनवादावर तिचा विश्वास आहे. मतमतांतराच्या गलबल्यातून, कोलाहलातून हाती काय काय चांगले लागू शकते याचा सतत शोध घेताना दिसते. वाद वाढवण्यापेक्षा वादात समेट घडवून आणण्याची भूमिका चव्हाणांच्या लेखणीत दिसते. हे करताना बऱ्याच वेळा मनात येतील तसे विचार मांडत जातात, त्यामुळे कधी कधी वाक्याचा रूपबंध बेढब होत जातो. व्याकरणिक संगतीची मांडामांड बिघडते. वाक्यरचना शिथिल झाल्यासारखी वाटते. अर्थात ह्या त्यांच्या प्रकट चिंतनाचा परिणाम असतो. त्यामुळे आशय प्रतिपादनाला बाधा येत नाही. उदाहरणार्थ जीवनाचा केंद्रबिंदू 'ईश्वर' बनणार नाही, तो 'मानव'च राहील याची खबरदारी ते सदैव घेतात. त्यामुळेच अस्पृश्यता ही ईश्वरनिर्मिती नाही. किंवा कोणताही ग्रंथ ईश्वरनिर्मित नाही हे मत त्यांनी आपल्या लेखनातून परखडपणे मांडले आहे.

ईश्वरवादी व निरीश्वरवादी किंवा अनात्मवादी व आत्मवादी विचारसरणीमधला समन्वय साधण्याचा प्रयत्न रा. ना. चव्हाणांच्या वैचारिक लेखांमधून झालेला दिसतो. त्यामुळे ते अध्यात्माकडे झुकलेले दिसत असले तरी आध्यात्मिक विचारातील उणिवा दाखवून दिव्यत्त्वासंबंधीचे विचारही त्यांनी मांडले. त्यांच्या पुढे केवळ हिंदूधर्म कधीच नव्हता हे त्यांचे फार मोठे वैशिष्ट्य असून सर्वच धर्मास आलेले अशुद्ध, विकृत व मर्यादित स्वरूप नष्ट व्हावे व ते व्यापक होत राहावे. ते अगदी विश्वधर्माकडे मार्गक्रमण करणारे ठरावेत असे त्यांना वाटत होते.

रा. ना. चव्हाण यांच्या लेखनाच्या व कार्याच्या काही मर्यादाही जाणवतात त्यापैकी एक म्हणजे रा. ना. चव्हाण यांनी काही अपवाद वगळता फारशा संस्था, शाळा तत्सम मंडळे काढली नाहीत, पण त्यांनी व्यक्तिगत पातळीवर समाजप्रबोधनाचे केलेले कार्य वाखाणण्यासारखे व प्रशंसनीय आहे. त्यांच्या कार्याने एक प्रकारची लोकशिक्षकाची भूमिका बजावली आहे. कृतीच्या पातळीवर रा. ना. चव्हाणांनी वाई या त्यांच्या जन्मभूमीत ब्राह्मोसमाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, शिवाजी वाचनालय, लोकमान्य टिळक ग्रंथालय यासारख्या माध्यमातून थोडेफार अपवादात्मक उपक्रम राबविले. मात्र त्यांनी आपल्या कार्याच्या व ध्येयाच्या पूर्ततेसाठी लेखन हेच प्रमुख व प्रभावी साधन किंवा माध्यम म्हणून निश्चित केले असल्याचे दिसून येते.

**संदर्भ:**


१. अक्षरवेध - रा. ना. चव्हाण – (संपा.) रमेश चव्हाण.

२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी – रा. ना. चव्हाण – (संपा.) रमेश चव्हाण.

३. रा. ना. चव्हाण समग्र वाङ्मय – (संपा.) मो. नि. ठोके.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शोध व बोध - रा. ना. चव्हाण – (संपा.) रमेश चव्हाण.

५. जनजागरण - रा. ना. चव्हाण – (संपा.) रमेश चव्हाण.